Dr.P.D.Hospital & R.C.Amravati
Outward No. :- 1715/24
Date :- 25/05/2024

श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित
डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालय व अनुसंधान केंद्र अमरावती

दि. २४.०५.२०२४

## निविदा सुचना

याव्दारे सर्व कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालया मार्फत खाली नमुद केलेले कंत्राट देण्याकरीता पंजीबध्द कंत्राटदारांकडुन व्दि-लखोट पध्दतीने सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. कामगार पुरविणा-या कंत्राटदारांना विविध वर्गवारी करीता किमानवेतन अधिनियमानुसार निविदा सादर कराव्या लागतील. छापील निविदा वैद्यकीय अधिक्षक कार्यालयामध्ये खालील नमुद क्र. १ ते ४ कंत्राटा करीता रू.२०,०००/- प्रत्येकी तसेच क्र. ५ ते ११ करीता रू.१०,०००/- रोखीने भरून दि. ०१/०६/२०२४ ते दि. १०/०६/२०२४ च्या दुपारी ४ पर्यंत विकी करीता उपलब्ध राहतील. सदर निवीदा भरून दि. १३/०६/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजे पर्यंत वैद्यकिय अधिक्षक कार्यालयात सादर करावयाच्या आहेत. या नंतर आलेल्या निविदांचा विचार केल्या जाणार नाही. सादर केलेल्या निविदांचे दर ९० दिवसा पर्यंत किंवा त्यावर निर्णय होई पर्यत संबंधीतांवर बंधनकारक राहतील. मोहरबंद निवीदा अधिष्टाता कार्यालयाच्या सभागृहामध्ये निविदा समिती समक्ष उघडण्यात येतील. निवीदा उघडण्याबाबतच्या सभे करीता निवीदाधारकांना तारखेची माहिती मोबाईलवर कळविण्यात येईल व कोणतेही कारण न देता सर्व निविदा मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अधिकार निविदा समिती, मा.अधिष्ठाता व वैद्यकीय अधिक्षक यांनी राखून ठेवलेला आहे. निविदा बाबतच्या अटी व शर्तीचे निवीदा प्रपत्र सोबत देण्यात येईल. क्रमांक १ ते ४ पदां करीता त्यांच्या नावासमोर नमुद केलेली शैक्षणीक पात्रता असणे व कामगार नमुद संख्ये नुसार पुरविणे बंधनकारक राहील. दर्शविण्यात आलेल्या पद संख्येत आवश्यकते नुसार बदल होवु शकतो. (कमी किंवा जास्त) प्रत्येक वर्गवारी करीता वेगळी निवीदा सादर करणे आवश्यक आहे. मोहरबंद निविदा सादर करते वेळी लिफाफया वर कोणत्या वर्गवारी करीता निविदा सादर करीत आहात. याचा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच सध्या कार्यरत असलेल्या ज्या कंत्राटदाराचे Dues (भाडे, विदयुत व पाणी) चालु महिन्यापर्यंतचे थकीत असतील. तर त्यांची निविदा स्वीकारण्यात येणार नाही. त्यांनी Dues क्लीअर असल्याबाबतचे प्रमाणपत्र / पावती दाखुन / जोडूनच निविदा सादर करावीत.

| अ.क | कंत्राटाचे विवरण | शैक्षणिक पात्रता | अंदाजित पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स पुरविणे | ३ वर्षीय जी. एन.एम / नर्सिंग कोर्स पास | ३५० |
| २ | परिचर पुरविणे + टेक्निकल स्टाफ | एच.एस.सी.पास + टेक्निकल कोर्स | २७५+४० |
| ३ | सफाई कामगार पुरविणे | एस.एस.सी.पास | १३० |
| ४ | सुरक्षा गार्ड पुरविणे | एस.एस.सी.पास | १०० |
| ५ | उपहारगृह चालविणे | | |
| ६ | मेस चालविणे (Boys,Girls& P.G.Mess) | | |
| ७ | चष्मा काउंटर चालविणे | | |
| ८ | वाहनतळ चालविणे | | |
| ९ | इंप्लांटस पुरवठादार (Ortho, Dentistry & Surgical) | | |
| १० | कपडे धुलाई (Laundry) | | |
| ११ | डेली निडस शॉप | | |

वैद्यकीय अधिक्षक
डॉ.पं.दे.रूग्णालय, अमरावती

अधिष्ठाता,
डॉ.पं.दे.वै.महाविद्यालय,अमरावती